रंग. व.३, अं.२/३, सप्टें/ऑक्टो. १९०९ या अंकात, ‘ नाट्यविषयक चर्चा या सदरात ‘ मोठ्या लोकांच्या लहान चुका या शीर्षकाखाली कालिदासाच्या ‘ विक्रमोर्वशीय मधील रंगसूचीतील (stage direction) एक चूक दाखविली आहे, नटाच्या अभिनयाच्या दृष्टीने ती महत्त्वाची आहे म्हणून तिचा येथे निर्देश करावासा वाटतो. याखेरीज, आगरकर-विकारविलसित, किर्लोस्कर-सौभद्र, कोल्हटकर-मूकनायक, मतिविकार, गुप्तमंजुष, खाडिलकर-कीचकवध याही नाटकांतील काही सूक्ष्म चुका दाखविल्या आहेत.

लेखक म्हणतो, कालिदासाने विक्रमोर्वशीयमध्ये पाचव्या अंकात एक विलक्षण रंगसूची दिली आहे. राजकुमार आयूच्या बाणावरील अक्षरे वाचताच राजाला कळे की आपल्याला मुलगा आहे. ही गोष्ट कळताच ‘‘ राजा सापत्यतां रूपयति ’ म्हणजे राजा आपल्याला मुलगा आहे असे दर्शवितो. हे कसे दर्शविणार फार तर आनंदाची परमावधी चेहेऱ्यावर दाखविता येईल. पण तो आनंद मुलगा झाल्याबद्दलचा आहे हे व्यक्त करण्याचा मार्ग कोणता एखाद्या अभिनयपटूने याचा निर्णय करावा.

आपले शब्द नटाला, अभिनयाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवावयाचे असतात हे लक्षात घेऊन नाटककाराने शब्दयोजना, रंगसूची यांकडे पाहिले पाहिजे हे या विवेचनावरून दिसते.

रंग. व.३, अं.१० मे १९१० च्या अंकात ‘ लिहून झालेले स्फुट लेख मध्ये, ‘ किर्लोस्कर सं. मं. चा अहमदनगरचा मुक्काम यावर ‘ रामचंद्र या सहीने काही मजकूर आलेला आहे. ‘मूकनायक नाटकाच्या प्रयोगातील एक निरीक्षण लेखकाने व्यक्त केले आहे. लेखक म्हणतो, मूकनायक नाटकात मि. जोगळेकरांच्या हातावर मि. बोडस हे टाळी मारण्याकरिता हात वर उचलतात पण त्यावेळी मि. जोगळेकर हे प्रेक्षकांकडे पाहात असतात. त्यामुळे मि. बोडस यांना हात खाली घ्यावा लागतो. ठरलेल्या सवयीच्या गोष्टी चुकल्या तर पुन: कधी मि. जोगळेकर टाळीकरिता हात पुढे करतील पण मि. बोडस असे समजतील की मि. जोगळेकर हे टाळी घेत नाहीत. तेव्हा साराच डाव फसेल.

टाळी देणे आणि घेणे या लहानशा क्रियेतसुद्धा नाट्यप्रयोगात कसा सुसंवाद असावा लागतो ते येथे दिसते. सूक्ष्म दृष्टीने पाहणाऱ्या प्रेक्षकांना अशा गोष्टी खटकत असत ही गोष्ट महत्त्वाची आहे. ही लहानशी गोष्टसुद्धा पत्ररूपाने कळवावी असे वाटण्याइतपत प्रेक्षक

जागरूक होते. ‘मूकनायक हे किर्लोस्कर नाटक मंडळीचे नाटक असूनही, बोडस जोगळेकर हे नाणावलेले नट असूनही अशा त्रुटी राहात होत्या याचा अर्थ नाटकाच्या तालमी कसोशीने घेणे आवश्यक असते. प्रत्येक हालचाल, प्रत्येक कृती काळजीपूर्वक बसवून घेतली पाहिजे. नटांचा अभिनय हा, रंगमंचावरील इतर पात्रांच्या प्रतिसादावर अवलंबून असतो. स्वत: उत्तम अभिनय केला पाहिजे त्याचप्रमाणे बरोबरीच्या नटांना आवश्यक तो प्रतिसादही दिला पाहिजे तरच नाट्यप्रयोगाची रंगत वाढते, नाहीतर रसिक प्रेक्षकांचा विरस होतो. प्रत्येक छोट्या गोष्टीतील यशावर एकूण नाट्यप्रयोगाचे यश अवलंबून असते याची जाणीव या लेखनात दिसते. ही प्रयोगसमीक्षा महत्त्वाची आहे ती हे भान त्यात व्यक्त झाले आहे म्हणूनच.

शारदा नाटकात पोरे म्हाताऱ्याची इतकी चेष्टा करतात की शेवटी भद्रेश्वराला जा म्हणून सांगावे लागते. नाटकातले ‘ निघा म्हणणे व खाजगी ‘ जा म्हणणे यात अंतर आहे. तेव्हा नियमित गोष्टीच्यावर फाजील काम रंगभूमीवर होऊ लागल्यास आतून इशारा मिळावा. पण स्टेजवर धक्काबुक्की नको.

लतामंडपात शकुंतला भाषण करीत असताना दुष्यंत ते भाषण आडून ऐकत असतो. पण ह्यावेळी मि. जोगळेकर हे आत जाऊन बसतात. (out 0f stage) शिवाय लतामंडप हे वेलीचे चार खांब असतात तसे नको. शकुंतलेला व तिच्या दासींना दुष्यंत न दिसला पाहिजे इतक्या दाट वेली त्या मंडपाला असाव्या हरएक गोष्ट इतक्या लक्षपूर्वक व प्रशस्त रीतीने मांडणे म्हणजे रंगभूमी हेच विश्व बनविणे होय. शकुंतला अर्धा तास भाषण करणार तोपर्यंत, या काम करणाऱ्या दुष्यंताला कंटाळा येणे साहजिक होय.

मृच्छकटिक नाटकात गाडीवानाला हुकूम होताच गाडी आत नेली जाते. पण गाडीवान गाडीशेजारी जाताच गाडी हालावी हे ठीक. नाहीतर पहिला हुकूम गाडीवानाला केला नसून बैलांना केला असे होईल. जास्त घाई होते. वसंतसेनेला इब्राहीम करीमची छत्री नको. जर किनखापी छत्री दिली जाईल तर जास्त चांगले दिसेल. चारुदत्त लोहशूळ ‘स्कंधावरिस्थापियला म्हणत असताना मांगाजवळ देतो हे ठीक नाही.

एकदा एकाने वस्त्र घेतलेले अगर नेसलेले दुसऱ्यास नको.

वर्ष ४, अं.४, एप्रिल १९११ - चुकांची झोळी - पृ. ५८, जय-विजय

दि. १९-२-१९११ रविवार रोजी झालेला किर्लोस्कर नाटक मंडळीचा ‘ सौभद्र चा प्रयोग पाहून सुचलेले विचार व्यक्त केले आहेत.

ले`खक (जय-विजय) म्हणतो आपल्याकडे नाटकावर (म्हणजे लिखित नाटकावर) जितकी टीका होते तितकी प्रयोगावर होत नाही. प्रयोगावर तीन प्रकारांनी टीका करता येते.

१) वर्तमानपत्रे नाट्यप्रयोगांवर लिहितात. पण ‘ एकं दरीत प्रयोग चांगला झाला. मंडळी होतकरू आहे. (किंवा मंडळीने पूर्वीचे नाव कायम राखिले आहे.) व मंडळी लोकाश्रयाला पात्र आहे. इ. इ. ठरीव टीकेच्या पलीकडे आपली वर्तमानपत्रे जात नाहीत. (कदाचित् ती प्रागतिक पदाची नसावीत.)

२) वर्तमानपत्रातून प्रेक्षकांनी टीका करणे हा दुसरा प्रकार. अशी टीका करणारा इसम विद्वान असावा लागतो. नाही तर तोच टीकाविषय होऊन बसतो. टीका करणारा इसम ‘‘निराश झालेला नाटककार किंवा सटरफटर लेखक (scribber) असून भागत नाही.

३) तिसरी तऱ्हा - (अ) म्यानेजरला समक्ष भेटून, (ब) म्यानेजरला आपले विचार लेखी कळविणे.

टीका करताना किंवा टीकेला प्रत्युत्तर देताना ‘‘ रावसाहेबांचा व प्रस्तुत लेखकाचा मित्रत्वाचा संबंध असल्यामुळे रावसाहेबांच्या गैरसमजाने लेखाला (?) प्रत्युत्तर देण्याच्या भानगडीत आम्ही पडत नाही. ’ असे म्हणून स्वस्थ बसणे हे केव्हाही इष्ट नाही.

सौभद्राच्या प्रयोगात दिसलेले दोष सांगितलेले आहेत-

१) अर्जुनाचे धनुष्य (की धनुकली) फारच लहान होते. अर्जुनाच्या धनुष्याच्या प्रत्यंचेचा आवाज ऐकून शत्रूचे हृदय कंपित होते. तो आवाज (नाटकातील) मेघगर्जनेप्रमाणे भासे. अर्जुनाचे धनुष्य द्रोणाचार्यांनी धनुर्वेदाचे शिक्षण द्यावयास सुरुवात केली त्यावेळचे न दाखविता ज्या धनुष्याने सर्वांना पिटाळून लावून अग्नीला खांडववन खावयास दिले त्यावेळचे दाखवावे. धनुष्याच्या मानाने त्याचा बाण फारच मोठा होता.

२) अर्जुन व राक्षस यांचा झगडा लागून ते दोघेही पडद्यात जातात. तेथे पडदा कोठून आला सुभद्रा आपणाला बागेत आहे असेच समजते. अर्जुन राक्षसाला मारण्याच्या वेळी जे शब्द बोलतो ते ऐकल्यासारखे करून सुभद्रेने आपल्या चेहऱ्यावर आश्चर्य व भीती हे विकार दाखवले. लेखक म्हणतो, वरील शब्द ऐकले आहेत असे सुभद्रेने दाखवू नये. कारण मनुष्यस्वभावाप्रमाणे बागेत हे शब्द कोठून ऐकू येत आहेत याबद्दल, तिला जिज्ञासा उत्पन्न झाली असती व 'ब लसागर वीरशिरोमणी मदतीला असते तरीसुद्धा तिला तिथे राहण्याची बुद्धी झाली असती किंवा नाही याची शंकाच आहे. व कदाचित् पुढे जो प्रसंग ओढवला तो आधीच ओढवला असता असे मला वाटते.

३) रुक्मिणीने अंगठी उजव्या हाताच्या कनिष्टिकेत घातली होती. बायका कधीच उजव्या हातात अंगठी घालीत नाहीत. रुक्मिणीचे काम करणाऱ्या पात्राने कदाचित् नेहमीच्या सवयीप्रमाणे (पुरुषांच्या) आंगठी उजव्या हातात घातली असेल. ही गोष्ट क्षुल्लक आहे पण महाराष्ट्रला भूषणभूत असलेल्या कंपनीत ही चूक होणे इष्ट नाही (इतर कंपन्यात संगमनाथाच्या देवळाला पूर्ण प्रदशिक्षा घातली तरीसुद्धा हरकत नाही.)

४) ' बाईसाहेबांना झोप येत आहे तर तुम्ही सर्वजणी आपापल्या ठिकाणी निघून जा हे किंवा अशा अर्थाचे शब्द रुक्मिणीच्या दासीने इतर दासींना सांगताच जाणाऱ्या दासींनी लवून सलाम केला. तो सलाम त्यांनी कोणाला केला कारण रुक्मिणी तर त्यांना दिसत नाही.

५) चवथ्या अंकाच्या आरंभी अर्जुन फारच पडद्याजवळ बसला हाता व त्यामुळे त्याला क्रोधावेशात नकळत खांबाचा भंग करण्याची पाळी आली. मला वाटले, मी नारसिंहावतारातीलच प्रसंग पाहतो आहे की काय इतक्या जवळ न बसावे ते चांगले.

यानंतर इतर काही नाटकांच्या प्रयोगासंबंधी सूचना केल्या आहेत.

मतिविकार मध्ये चहा पिताना शास्त्रीबुवा आपले जोडे काढतात, पण पगडी काढीत नाहीत, ती का बरे शास्त्रीबुवांनी केशकलाप ठेवल्यामुळे त्यांना पगडी काढण्यास लाज वाटत असावी. स्त्री पार्ट करणाऱ्याला ज्याप्रमाणे मिशीला रजा द्यावी लागते त्याचप्रमाणे

शास्त्रीबुवांचे काम करणाऱ्या इसमाने केशकलापाला रजा द्यावी किंवा शास्त्रीबुवांचे काम करू नये. अथवा चहा पिण्याचा प्रसंगच गाळून टाकावा.

प्रेमशोधना तले ' ममलाज हे इंदिरेचे पद गाळले तर बरे होईल. हे पद शोकावेशात म्हटले जात असल्याने चांगले वठत नाही. शोकावेशातली कंदनाची चवथ्या अंकातली पदे गाळली तर तो प्रवेश उत्तम होईल. हे नाटक ' साग्र संगीत ना मग प्रत्येक वेळी संगीत पाहिजेच. पानाच्या खडबडण्याने दचकणारा खंडूजी तारेच्या महालात आपण तारेत आहोत असे भासवीत तानावर ताना सोडतो. तरी बरे अजून हॅम्लेट संगीत झाले नाही. नाहीतर हॅम्लेटच्या तोंडी पाचपंचवीस पदे व डेस्डिमोनाच्या जींहशश्रश्रच्यिा तोंडीही मरताना पद असावयाचेच. वरचा प्रकार तशापैकीच आहे.

लोकरंजन करून सामाजिक विचाराकडे लोकमत बनविण्याचा मंडळीचा प्रयत्न स्तुत्य आहे. कोल्हटकरांची नाटके करण्यात कंपनीने दाखविलेली चिकाटी प्रशंसनीय आहे. असा अभिप्राय दिला आहे.

वर्ष ४, अं.६, जून १९११ – पत्रव्यवहार – किर्लोस्कर मंडळीस दोन सूचना

खाडिलकर यांच्या ' मानापमान चा प्रयोग पाहून सूचना –

१) पत्रलेखक म्हणतो, खेळ पाहण्यास जागेवर येऊन बसलो तेव्हा नानासाहेबांच्या ' मन नटवरा विस्मयकारा या पदामध्ये बऱ्याच ताना ऐकू येतील असे वाटत होते. कारण मानापमान नाटक वाचताना (पडद्यात ' मी साफ येणार नाही. पुन्हा बजावून सांगते मी साफ येणार नाही.) असे नायिकेचे शब्द आहेत. ते नटीचे शब्द आहेत असे मानून सूत्रधार तिची समजूत करण्यास जातो, तेव्हा नायिकेची आर्जवे करून तिला शांत करणारा सूत्रधार पुढील नाटकात नायकच पाहिजे अशी माझी समजूत झाली आहे. तेव्हा सूत्रधाराचे काम जोगळेकरांनीच केले पाहिजे असे वाटते. जवळजवळ अशाच धर्तीचा प्रवेश रामराज्यवियोग नाटकात आहे. त्यात जो सूत्रधार तोच दशरथ व नटी तीच मंथरा अशा भूमिका असतात.

२) सूत्रधार गेल्यावर महिषासुर मर्दिनीच्या देवळाचा सुंदर देखावा दृष्टीस पडतो. तेथे दोन भिक्षुक ब्राह्मण दिसतात त्यापैकी एकाचे केस राखलेले होते ते त्याच्या भूमिकेला अगदी

योग्य नव्हते. त्याने केस अजिबात काढावेत असे माझे म्हणणे नाही. पण त्या ब्राह्मणाला एक सकलादीची तांबडी टोपी घालण्यास द्यावी.

३) परवाच्याच ‘रंगभूमी च्या अंकात बायकांच्या उजव्या हातात अंगठी नसते इ. टीका, सूचना असतानाही भामिनीच्या उजव्याच बोटात हिऱ्याची अंगठी दृष्टीस पडते हे आश्चर्य आहे. हा काय कंपनीचा हट्ट म्हणावा की हलगर्जीपणा म्हणावा योग्य सूचना असेल तर ती अंमलात आणण्यास कसूर करता कामा नये.

जाणकार प्रेक्षक, सौभद्र, मानापमान हे किर्लोस्कर मंडळीचे खेळ पहात होता. ‘रंगभूमी नियतकातील विचार वाचत होता. पण कंपनीच्या मॅनेजरला स्पष्टवक्तेपणाने आपली मते ऐकवीत होता हे यातून दिसते. हे विरोधी असूनही छापण्याचा चांगुलपणा संपादकांनी दाखवला आहे.

४) ‘मालती - इश्श खरच गळा मोकळा आहे; एखाद्या विधवेच्या गळ्यासारखा अपशकुनी दिसतो.

स्त्रियांच्या तोंडी ‘विधवा हा शब्द कधीही येत नाही. तेव्हा तो शब्द काढून दुसरा एखादा सभ्य शब्द - स्त्रियांना योग्य असा योजावा, अथवा वाक्य अजिबात गाळावे. या सूचना ‘किर्लोस्कर कंपनीचा एक अभिमानी यांनी केलेल्या आहेत. हा प्रेक्षक म्हणजे शंकर नारायण सहस्त्रबुद्धे हे पुढील पत्रावरून कळते.

‘मानापमान नाटकाच्या प्रयोगात सूत्रधाराची भूमिका कोणी घ्यावी ?
शंकर नारायण सहस्त्रबुद्धे

मानापमान चे पुस्तक वाचताना, सूत्रधार व पारिपार्श्वक यांच्या संभाषणावरून, सूत्रधारच पुढील प्रयोगात नायकाची भूमिका करीत असला पाहिजे हे लक्षात येते. परंतु प्रत्यक्ष प्रयोगात ही समजूत चुकीची आहे असे वाटते. ‘सत्रधार व नटी यांच्या संभाषणावरून ते पुढील नाटकप्रयोगात कोणत्या भूमिका घेणार हे समजण्यासारखे रामराज्यवियोग हे एक नाटक आहे. या नाटकात सूत्रधार नटीचा पुढील प्रयोगात पतिपत्नीचा कोणत्याही प्रकारचा

संबंध न ठेवता कवीने दशरथ व मंथरा या भूमिका घेण्यास त्यांना भाग पाडले आहे - श्री. सहस्त्रबुद्धे यांच्या शंकावजा सूचनेवर संपादकांचे उत्तर असे.

ंसस्कृत नाटकात सूत्रधाराने पुढील नाटकाची प्रस्तावना करून देण्याचे पाच प्रकार आहेत. त्यापैकी मानापमान व शापसंभ्रम इ. नाटकातला एक प्रकार आहे. नटीच्या पात्राच्या ठिकाणी नायिकेच्या पात्राचे अधिष्ठन कवीने केले म्हणजे सूत्रधार नायक झालाच पाहिजे असा निर्बंध नाही. पुढील पात्राची सूचना पूर्वीच्या पात्राने करावयाची हा संस्कृत नाट्यशास्त्राचा नियम आहे. त्याला अनुसरून मानापमान नाटकातील नायिकेचे पात्र सूत्रधाराकरवी कवीने रंगभूमीवर आणले आहे.

उत्तररामचरित - भवभूती - या नाटकाच्या प्रयोगाच्या संदर्भात संपादकांची मते - कित्येकांच्या मते हे नाटक प्रयोगास अयोग्य आहे. आम्हास तसे वाटत नाही. जो या नाटकाशी एकजीव होणार नाही त्याला हे नाटक पाहण्याला नीरस वाटेल. या नाटकात ज्याला Action म्हणतात, ते नाही. पण Situation हृदयाला चटका लावणारे प्रसंग पदोपदी आहेत. नाटक कसे करावे हे तर शिकले पाहिजेच परंतु त्याबरोबरच पाहावे कसे, वाचावे कसे, हेही शिकले पाहिजे.

वर्ष ५वे, अं.२, दि. १७-६-१९१२ : टीकाविषयक जुने लेख पृ. १३ ते ३२

यामध्ये किर्लोस्कर मंडळीच्या मॅनेजरना आलेली इ.स. १८८८-१९०० मधील जुनी पत्रे छापली आहेत. त्यात इ.स. १९०० मधील श्री. न. चिं. केळकर यांनी पाठविलेले पत्र आहे. त्यात ‘ शारदा नाटकाचे दोन प्रकार पाहून केलेल्या सूचना आहेत

या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१) नटी ‘ काय पुरुष इ. पद म्हणत असता सूत्रधार काहीच अभिनय करीत नाही, सूत्रधारास नटीचे उद्गार पसंत असतील अगर नसतील, त्या पसंती-नापसंतीचे स्वरूप अभिनयाचे द्वाराने प्रगट झाले पाहिजे. स्टेजवर दोनच पात्रे असता एकाचे पद म्हणून होईपर्यंत दुसऱ्यास फार वेळ माशा मारीत अगर जांभया देत बसावे लागते. हा सर्व संगीत नाटकात साधारण असा दोष आहे. परंतु न गाणाऱ्या पात्राने मधूनमधून पद्यातील अर्थास

अनुसरून उद्गार काढल्यास व तदनुरुप अभिनय केल्यास मुखस्तब्ध व सभाजनांची तोंडे न्याहाळीत बसलेल्या पात्राचे देखाव्याने प्रेक्षकांवर पडणारा ताण किंचित् ढिला होईल.

२) दिंडीत केलेले वर्णन भुजंगनाथाचे सोंग पाहून मुळीच मनास पटत नाही. हा दोष वर्णनाचा नसून सोंगाचा आहे. भुजंगनाथ खरोखर म्हातारा परंतु तरुणपणाची ऐट करणारा असा दुटप्पी आहे. त्यामुळे त्याचे सोंग साधणे कठीण आहे. तथापि नाटकास प्रेक्षकांचे मनावर ठसा उमटण्यास भुजंगनाथ म्हातारा दिसल्यावाचून इलाज नाही. निदान पहिल्या प्रवेशात तरी भुजंगनाथ सर्वांगवृद्ध दिसलाच पाहिजे. प्रवेशात तो स्टेजवर येण्याचे वेळी त्याचा लग्न करण्याचा निश्चय अद्यापि ठरायचा आहे व तरुण दिसण्याच्या बतावणीस तो अद्यापि जोराने लागलेला नाही. दातांची कवळी दीक्षिताचे उपदेशावरून अद्यापि बसवावयाची आहे. तेव्हा भुजंगाने म्हाताऱ्यासारखे बोललेच पाहिजे. शारदेपुढे कवळी पडल्यावर किंवा शंकराचार्यांपुढे ज्या थाटाने भुजंगनाथ बोलतो तसेच त्याने पहिल्या प्रवेशात बोलले पाहिजे भुजंगनाथाची गालफडे बसलेली दाखविली पाहिजेत. ''सुंदर खाशी ' हे पद खरोखरच ढळढळीत म्हाताऱ्या दिसणाऱ्या सोंगाचे तोंडातून येईल तरच त्याची मौज. पद म्हणताना म्हाताऱ्यासारखे उच्चार काढले तर, बहार होईल. एकवेळ करून पाहावे. भुजंगनाथाच्या चर्येवरील भाव ' सुंदर खाशी हे पद म्हणताना कधीच पालटत नाहीत. त्याने उल्लूपणा दाखविला पाहिजे. पदात चावटपणा खपतो. मग तो तोंडावर का न दिसावा ?

३) '' मीच रात्रि शय्या ' या कटावातील प्रत्येक शब्द चांगला आहे पण गाण्यात जो चांगलासा ऐकू येत नाही. याकरता त्यातील अर्थ गद्यातून सांगितला तर मौज होईल. प्रथम एकवेळ पद्य म्हणून मग तेच गद्यरूपाने सांगण्यास काय हरकत आहे दीक्षितांनी कटाव म्हणून झाल्याबरोबर '' कसे कसे म्हटलेत ' असे सूचक शब्द बोलावे म्हणजे झाले.

४) कोदंड व त्याचा मित्र यांच्या पोशाखासंबंधाने बराच विचार व्हावयास पाहिजे. प्रस्तुतचे त्यांचे पोशाख ब्राह्मण ब्रह्मचाऱ्यास साजेसे नाहीत. इस्तरी केलेले शर्टाचे कप पाहून विरागी ब्रह्मचाऱ्याची निम्मि कल्पना ढासळते. हा ''धुवट ' ब्रह्मचारी उपयोगाचा नाही. गावातल्या लहान मोठ्या पोरी नमस्कार करून ज्याच्याशी बोलत उभ्या राहू शकतील, त्याचा पोशाख, जटा, भस्म, कदाचित्, भगवी कफनी असाच असला पाहिजे. हल्ली ते बंगाली बाबूसारखे दिसतात असे एकाने म्हटले आहे, तेच खरे आहे.

५) सर्व मुली उभ्या राहून सर्व प्रवेश संपवितात. त्यांचा प्रेक्षकांना कंटाळा येतो. उभे राहून निरनिराळे अंगविक्षेप करण्यास जड जाते. काही मुली उभ्या आहेत. काही कशास तरी टेकून बसल्या आहेत. कोणी एकमेकीच्या गळ्यात हात घालून उभ्या अशा दाखवाव्या. शारदेस कडेस घालू नये, मध्ये घ्यावी.

६) जान्हवी - ‘‘ शारदे मी म्हणते ’ हे सर्व भाषण फार प्रौढ, खुबीदार आहे. वर्णन सुंदर आहे. पण ते सर्व ५ वर्षांच्या मुलीच्या तोंडातून ऐकून कसेकसेच वाटते. सर्व भाषण कोणीतरी प्रौढ मुलीने करावे किंवा दोघीतिघींनी मिळून संपवावे. व शेवटचा हास्यकारक चालण्याचा अभिनय मात्र लहान मुलीकडून करवावा. लहान मुलांस वेडावता चांगले येते पण अलंकारिक मार्मिक वर्णन करता येणे अस्वाभाविक होय. शिवाय वर सुचविल्याप्रमाणे केल्यास सर्व मुलींस थोडे थोडे बोलण्याचा भाग मिळेल. एरवी नुसती मुलींची परेड दिसते.

७) इंदिरा सर्व वेळ काही आसरा न घेता अगदी मध्ये उभी का ? घरात तरी असे असते का ? इंदिरा टेकून तरी उभी असावी. काही वेळ मध्येच जमेल तर तिने बसावे व रागाचे झपाट्यात किंवा विनोदाचे मुरक्यात उठावे. निदान हातात काही तरी चाळा करण्यास गृहप्रपंचाचा उद्योग घेतलेला असावा.

८) ‘‘ सांवळा वर बरा ’ पदांतील कल्पना मार्मिक आहे. पण प्रेक्षकांस गाण्यामुळे कळण्याचे नाव शून्य. गाण्यापेक्षा त्याचा अर्थ गद्यात ठसकेदार रितीने सांगितला तर टाळी पडेल.

९) हळदीकुंकवाच्या प्रवेशात सर्व मुलींनी रांगेत न राहता निरनिराळ्या (Groups) रचनांनी बसावे. शारदेस मध्ये घ्यावी.

१०) म्हाताऱ्याच्या मिशा निमपांढऱ्या का दाखवू नये कलप लावलेला आहे खरा. परंतु लगेच बुडखे पांढरे दिसू लागले, अशी भुजंगनाथच साक्ष देत आहे. या थेरड्याने तरुण दिसण्याचा जो प्रयत्न केला आहे तो सर्वांशी सफळ होण्यास मौज नाही; तर तो ठिकठिकाणी उघडकीस येत आहे. परंतु त्याचे त्याला फारसे कळून येत नाही. अशी सोंगाची बतावणी करण्यावर या नाटकपात्राचे स्वारस्य अवलंबून आहे.

११) आरशात चोरून पाहिले पाहिजे.

१२) लग्नमंडपात एवढा गोंधळ चालला असता अखेरपर्यंत कांचनभट आपल्याला झालेला प्रकार चमत्कारिक व अनिष्ट झाला असे वाटल्याचे मुळीच दाखवीत नाही. शेवटी देखील त्याच्या तोंडाची चर्या पालटत नाही.

१३) कोंदडास नेहमी पेटीजवळच उभे राहण्याची सवय दिसते, या सवयीस सबळ कारण असेल, पण ते वाईट दिसते.

१४) कांचनभटाचा वेश तेवढा वेड्याचा आहे. अभिनय मुळीच नाही.

शारदा नाटकाकडे सामान्य प्रेक्षकांप्रमाणेच विद्वानांचेही केवढे बारीक लक्ष होते हे या विस्तृत विवेचनावरून दिसून येते. यामध्ये न. चिं. केळकर यांनी केलेल्या प्रयोगाच्या संदर्भातील सूक्ष्म सूचना मौलिक आहेत.

दि. ७-४-१९०१ रोजी कोल्हापूर मुक्कामी किर्लोस्कर नाटक मंडळीच्या सेक्रेटरींना, ‘ एक परिचित व हितचिंतक या स्वाक्षरीने आलेले पत्र याच अंकात छापलेले आहे. त्यात पत्रलेखक म्हणतो, मंडळीतील पात्रे व चालक अभिनयात प्राविण्य संपादण्याकडे दुर्लक्ष करीत आहेत ही खेदाची व मंडळीचेच असाधारणत्व नाहीसे करणारी गोष्ट आहे. नटाची मुख्य कुशलता अभिनयातच आहे. मंडळीचे प्रयोग पाहून मार्मिक प्रेक्षकवर्ग काय म्हणतो ते मोकळेपणाने ऐका असे पत्रलेखक स्पष्टपणे सांगून म्हणतो तुमच्या मंडळीला जर पूर्वीप्रमाणे गुण नाहीत तर प्रेक्षकांनी पूर्वीप्रमाणेच बिदागी काय म्हणून द्यावी नुसत्या नावाला पाहूनच की काय पूर्वींची पात्रेही आता कंपनीत नाहीत तरीही बिदागीचें मान तुम्ही पूर्वीचेच ठेवले आहे

पत्रलेखकाच्या या टीकेवरून त्याची निर्भीड वृत्ती दिसते. किर्लोस्कर नाटक मंडळीसारख्या नामवंत मंडळीस सुद्धा खडसावणारा प्रेक्षकवर्ग त्याकाळी होता ही गोष्ट स्पृहणीय आहे. ‘मू कनायक नाटकाच्या प्रयोगातील अभिनयाच्या काही चुका दाखवून एका असभ्य व रसहानी करणाऱ्या प्रकाराबद्दल पत्रलेखकाने नाराजी व्यक्त केली आहे. पत्रलेखक म्हणतो, वेषाने, भाषेने व कृतीने तल्लीन झालेल्या भूमिकेने आपली स्थिती विसरून जाऊन एखाद्या

कामुकाप्रमाणे वरचेवर रंगभूमीच्या वामभागाकडील माडीकडे पाहणे हा प्रकार अक्षम्य व लाजिरवाणा आहे. नायक व त्यांचा सहचर याकामी अग्रेसर होते.

या विवेचनावरून तत्कालीन नटांमधील असंस्कृतता स्पष्ट दिसते. समाजात नटांना मान का नव्हता याची कल्पना या वर्णनावरून येते. किर्लोस्कर नाटक मंडळी ही इतर नाटक मंडळ्यांच्या तुलनेने अधिक शिस्त असलेली, नटांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविणारी होती तरीही असे असभ्य प्रकार रंगभूमीवर करायला धजावणारी पात्रे होती, यावरून नाटक मंडळीचे सेक्रेटरीपद किती जोखमीचे होते हे कळते.

व.५, अं.९, १९१३ मध्ये, टीकाविषयक जुने लेख या सदरात ' शारदा नाटकासंबंधी निनावी पत्र आहे. हे पत्र दि. २९-६-१८९९ रोजी किर्लोस्कर नाटक मंडळीच्या सेक्रेटरीना मुंबई मुक्कामी पाठविलेले आहे. नाटक छापलेले नसल्यामुळे प्रयोगावरून विचार व्यक्त केले असल्याचा उल्लेख आहे. पत्रलेखक म्हणतो -

नाटक म्हणजे संसाराचे चित्र ही साधी, सोपी व सरळ व्याख्या आहे. पण या व्याख्ये बरहुकूम किती नाटके होत असतील याची शंका आहे. नाटकात राजा-राणी, शिपाई-प्यादे, शेट-सावकार नाहीत असे कधीच व्हायचे नाही. प्रत्येक नाटकात धनवानांचीच का गाठ पडावी हे आक्षेप काढून टाकण्यासाठीच की काय रा. देवल यांची ' शारदा अवतरली आहे. या प्रास्ताविकानंतर आपल्या पत्रात तीन मुद्यांचा परामर्ष घेतलेला आहे.

(१) रा. देवल यांची कृती,
(२) कामे करणारी मंडळी,
(३) समजत नाही असा भाग.

१) रा. देवल यांची कृती - रा. देवल यांची कृती उत्तमच आहे. पदे सरळ, सोपी व समजण्यासारखी आहेत. संविधानक मध्यम प्रतीचे आहे. रसांची कमतरता असल्याने मोहकपणा कमी आहे. पदांच्या चाली देखील चटकदार नाहीत हे ' वन्स मोअर च्या दुष्काळामुळे आपल्या लक्षात आले असेलच.

दीक्षित – लग्नाचे मध्यस्थ यादृष्टीने काम उत्तम आहे. यापेक्षा चटकदार वाक्ये निघतील तर बरे. पहिल्याच अंकात कोदंडाचा व त्यांचा संवाद मजेदार आहे. शेवटी रसभंग झाला आहे. राग आला असता मनुष्याचे प्रासिक नव्हे त्रासिक बोलणे येते.

कोदंड – नाटकाचा काळ कोणता हे निश्चित होत नाही. नाटकातील पात्रांची नावे विलक्षण आहेत व कदाचित् प्राचीन काळी असली नावे असावीत असा भास होतो.

कोदंडाच्या भाषणावरून ही आर्यभू परक्याच्या अंमलात आहे असे ध्वनित होते. मग मुसलमानांचा अंमल की इंग्रजांचा कोदंडाच्या भाषणात समाजसुधारणे विषयी काही यावयास पाहिजे होते.

श्रीमंत – या पात्राने सर्व प्रकारे निराशा केली. कोदंडाचा मित्र – नाटकात नायकत्व कोदंडाकडे असावे असे दिसते. तरी पहिल्याच प्रसंगी मित्र आपल्या अकलेची छाप कोदंडावर ठेवू पाहात आहे हे जरा विलक्षण दिसते.

नाटक छापले नसल्याने कर्त्याचा भाग कोणता, कंपनीने ‘ परवानगी घेऊन केलेला फेरफार कोणता हे समजत नाही. मध्यंतरी एका मुसलमान शिपायाचा अवतार आहे. हे पात्र देवलांचे की कंपनीचे

नटीचे भाषण चालू असताना सूत्रधार नुसते आपले विचारशून्य डोके खांद्यावर घेऊन उभे होते.

(ब) नाटकमंडळ्या, नट, नाट्यकलेची सुधारणा, नाटकाचा समाजावर परिणाम या विषयांवरील लेख

१ नाटक मंडळ्यांसंबंधी विचार

सवाई नाटकी या टोपणनावाने राम गणेश गडकरी यांनी ‘ नाटक मंडळ्यांच्या हिताचे चार शब्द रंगभूमी नियतकालिकात लिहिले आहेत. (वर्ष १, अंक ४, नोव्हें. १९०७)

नाटकाच्या धंद्याला कमीपणा येण्याची व तो भरभराटीला न येण्याची तीन प्रकारची कारणे देऊन विवेचन केले आहे.

(१) धंद्याच्या दृष्टीने
(२) सामाजिक दृष्टीने,
(३) कलेच्या दृष्टीने

लेखक सांगतो, नाटकाचा धंदा करण्यासाठी चार गोष्टी आवश्यक आहेत.
१) अभिमान बाळगून धंदा करणे (यात नाट्यकलेचा अभिमान व आपण ज्यात आहोत त्या नाटक मंडळीचा अभिमान हे दोन्ही अर्थ अभिप्रेत असावेत)
२) सभ्य रीतीचे वर्तन ठेवणे,
३) एका मंडळीत चिकटून राहणे,
४) निर्व्यसनी असणे.
यामध्ये नटांचे वाईट वर्तन, व्यसनीपणा आणि नाटक मंडळ्यात सतत चालणारा बेबनाव, फाटाफूट यांचा उल्लेख आला आहे. रंगभूमी नियतकालिकात, अनेक लेखात नाटक मंडळ्यांच्या फाटाफुटीबद्दल लिहिले आहे. कला व धंदा या दोन्ही दृष्टीने ही फाटाफूट हानिकारक होती हे जाणकारांना कळत होते पण होणारे टळत नव्हते. ‘सवाई नाटकी लिहितात नाट्यसंस्था हे एक ‘स्वराज्य आहे. नाटक मंडळीच्या मालकाने आपल्या शुद्धाचरणाने लोकांची मने जिंकणे महत्त्वाचे आहे.